प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

रविवार, दिनांक : १४ जुलै, २०२४

ठळक बातम्या

1. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा विकास आराखडा हा समाजातील वंचित घटकांना प्राधान्य देण्याचा आहे - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं काल मुंबईत प्रतिपादन.

2. पुरी इथल्या भगवान श्री जगन्नाथ मंदिराचा खजिना असलेल्या रत्न भंडाराचे सर्व दरवाजे आज दुपारी उघडण्यात आले- सुरक्षेसाठी तात्पुरत्या स्ट्रॉंग रूमची स्थापना.

3. राज्यात झिका या डासामार्फत पसरणा-या विषाणूजन्य आजाराचे सर्वाधिक रूग्ण पुण्यात- सार्वजनिक आरोग्य विभागाची माहिती.

4. कझाकस्तानमधल्या अस्ताना इथं पार पडलेल्या ३५ व्या आंतरराष्ट्रीय जीवशास्त्र ऑलिम्पियाड मध्ये भारतीय संघाला १ सुवर्ण आणि ३ रौप्य पदकं प्राप्त

5. हवामान खात्याचा आज चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोलीसाठी तर उद्या अमरावती, वर्धा आणि यवतमाळसाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी.

######

**पंतप्रधान मुंबई**

काल मुंबईत 29 हजार 400 कोटी रुपयांच्या विविध रस्ते आणि रेल्वे प्रकल्पांचं उद्घाटन, लोकार्पण आणि पायाभरणी कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडला. तरुणांना संधी उपलब्ध करून देणाऱ्या महाराष्ट्र सरकारच्या ‘मुख्यमंत्री युवा उमेदवारी योजनेची सुरुवात मोदी यांनी यावेळी केली. पायाभूत सुविधांच्या विकासात मैलाचा दगड ठरणाऱ्या लोकमान्य टिळक टर्मिनस इथल्या नव्या फलाटाचं आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथल्या विस्तारित फलाट क्रमांक 10 आणि 11 चं लोकार्पण मोदी यांनी यावेळी केलं. गेल्या तीन

ते चार वर्षांत आठ कोटी नवीन रोजगारनिर्मिती झाली असून त्यामुळे देशात बेरोजगारीबद्दलच्या अफवा पसरवणाऱ्यांना उत्तर मिळालं असल्याचं पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल झालेल्या जाहीर कार्यक्रमात या संदर्भातली आकडेवारी आणि आरबीआयच्या अहवालाचा हवाला देत, देशात कौशल्य विकास आणि रोजगाराची गरज आहे आणि सरकार या दिशेने काम करत आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. पालघरमधल्या डहाणू इथं ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदरालाही मंजुरी दिली असून, त्यातून १० लाख रोजगार निर्माण होतील असंही मोदी यांनी यावेळी सांगितलं.राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा विकास आराखडा हा समाजातील वंचित घटकांना प्राधान्य देण्याचा आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

**राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ**

पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांच्या गेल्या १० वर्षांच्या कार्यकाळात भारतातल्या हवाई वाहतूक क्षेत्रानं मोठी प्रगती केली असून ही वाहतूकसेवा जागतिक पातळीवर तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे, असं प्रतिपादन केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात केलं. पुण्याच्या लोहगाव विमानतळावर नव्यानं उभारण्यात आलेलं टर्मिनल आज मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवाशांच्या सेवेसाठी खुलं करण्यात आलं. यावेळी नव्या टर्मिनलवरून विमान प्रवास करणाऱ्या पहिल्या प्रवाशाला मोहोळ यांच्या हस्ते बोर्डिंग पास देण्यात आला.

**चंद्राबाबू नायडू**

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी आज आपल्या मुंबई भेटीदरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा बंगल्यावर सदिच्छा भेट घेतली. एकमेकांना लागून असलेल्या आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र या दोन राज्यांमधलं परस्पर सहकार्य वाढवून दोन्ही राज्यांचा विकास कसा साधता येईल याबाबत या बैठकीत प्रामुख्यानं चर्चा करण्यात आली.

**जगन्नाथ रत्न भंडार**

ओडिसातील पुरी इथल्या भगवान श्री जगन्नाथ मंदिराचा खजिना असलेल्या रत्न भंडारचे सर्व दरवाजे आज दुपारी उघडण्यात आले. एका विशेष पथकाद्वारे हे रत्न भंडार उघडण्यात आले. याआधी 1985 मध्ये हे दरवाजे उघडले गेले

होते. रत्न भंडारातील दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंची या आधीची यादी 1978 मध्ये घेण्यात आली होती. राज्य सरकारच्या मानक कार्यप्रणालीनुसार हे रत्न भंडार उघडण्यात आलं असून त्याच्या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येत आहे. रत्न भांडारची तपशीलवार यादी तयार करण्यात येणार असून यासाठी कडक सुरक्षा असलेली तात्पुरती स्ट्राँग रूम उभारण्यात आली आहे. 12व्या शतकातील श्री जगन्नाथ मंदिरातील रत्न भंडारच्या आतील खोलीत हिरे, सोने आणि मौल्यवान रत्नांसह दुर्मिळ दागिन्यांचा संग्रह आहे.

**झिका**

राज्यात झिका या डासामार्फत पसरणा-या विषाणूजन्य आजाराचे सर्वाधिक रूग्ण पुण्यात आढळले आहेत. राज्यातील एकूण २१ रूग्णांपैकी १९ रूग्ण पुण्यात, एक कोल्हापूरमध्ये तर एक संगमनेरमध्ये सापडला आहे. राज्यात आतापर्यंत २११ गर्भवतींचे रक्तनमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले असून १० गर्भवतींचा अहवाल सकारात्मक आला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागानं दिलेल्या माहिनुसार पुणे शहरात २० हजार ५८८, कोल्हापूरमध्ये सहा हजार ४४१, संगमनेरमध्ये पाच हजार ७८८ आणि सासवडमध्ये एक हजार ७०७ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. २४४ संशयितांचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. यामध्ये २११ गर्भवतींचा समावेश आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

**१० वी  आणि १२ वी परीक्षा पुरवणी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा -इयत्ता 12 वी दिनांक 16 जुलै ते 6 ऑगस्ट तसंच  माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता 10 वी दिनांक 16 ते 30 जुलै  या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

माध्यमिक आणि  उच्च माध्यमिक परीक्षा केंद्रावर कायदा आणि  सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये, यासाठी 16 जुलै रोजी सकाळी 6 वाजेपासून  6 ऑगस्ट रोजी  रात्री 8 वाजेपर्यंत  जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातील सर्व परीक्षा केंद्रांवर  मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत.

**खासदार प्रशांत पडोळे**

भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्राचे नव निर्वाचित खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी भंडारा ते अढ्याळ असा 25 किलोमीटरचा प्रवास एसटी बसने करत प्रवासी, आणि चालकाच्या समस्या जाणून घेतल्या. एस टी बस आणि बस थांबा उत्तम कसा करता येईल, या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढणार असल्याचं डॉ. प्रशांत पडोळे म्हणाले.

**आंतरराष्ट्रीय जीवशास्त्र ऑलिम्पियाड**

कझाकस्तानमधल्या अस्ताना इथं ७ जुलै ते १३ जुलै २०२४ दरम्यान झालेल्या ३५ व्या आंतरराष्ट्रीय जीवशास्त्र ऑलिम्पियाड- IBO- २०२४ मध्ये भारतीय संघाच्या एका विद्यार्थ्यानं सुवर्णपदक आणि तीन विद्यार्थ्यांनी रौप्य पदकं मिळवली. ३५ व्या आंतरराष्ट्रीय जीवशास्त्र ऑलिम्पियाड मध्ये ८० देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ३०५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत २९ सुवर्णपदकं देण्यात आली. यात मुंबईच्या वेदांत साक्रेनं सुवर्ण पदक, रत्नागिरीतल्या इशान पेडणेकरनं रौप्य पदक, तामिळनाडूतल्या चेन्नई इथला श्रीजीथ शिवकुमारनं रौप्य पदकं आणि उत्तर प्रदेशमधल्या बरेलीतला यशश्वी कुमारनं रौप्य पदक पटकावलं.

**कोरकु भाषा संम्मेलन**

साहित्य अकादमी व अटल बिहारी वाजपेयी हिंदी विश्वविद्यालय भोपाळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 15 व 16 जुलै रोजी भोपाळ येथील रवींद्र भवन परिसरात दोन दिवसीय कोरकू भाषा संमेलनाचे आयोजित करण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक प्रा डॉ काशिनाथ बर्हाटे हे या साहित्य संमेलनात सहभागी होऊन 'कोरकू वाचिक महाकाव्यचा इतिहास' या विषयावर सविस्तर विवेचन करणार आहेत. मेळघाट व मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वत रांगेतील आदिम समुदायाच्या कोरकु भाषेला युनेस्कोने अतिसंरक्षित भाषेच्या कक्षात घेतलेले आहे. भाषेवरील संकट आणि आदिवासी संस्कृतीतील कोरकु भाषेचं महत्व लक्षात ठेऊन कोरकु भाषा संम्मेलनाचं आयोजन करण्यात आलेलं आहे.

**हवामान**

विदर्भात आज सर्वत्र कमी अधिक प्रमाणात पावसाची नोंद झाली आहे. मागील चोवीस तासांत गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज इथं १४६ पूर्णांक ३ दशांश मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. हवामान खात्यानं आज चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोलीसाठी तर उद्या अमरावती, वर्धा आणि यवतमाळसाठी पावसाचा आणि सतर्कतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर १८ तारखेपर्यंत संपूर्ण विदर्भासाठी येल्लो अलर्ट जरी करण्यात आला आहे. दरम्यान गेल्या चोवीस तासांत सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद नागपुरात ३३ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतकी करण्यात अली आहे. पाऊस सर्वत्र नियमित पडत नसल्याने शतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

अमरावती जिल्ह्यात अद्यापही जोरदार पाऊस आलेला नाही. परिणामी, कोरडवाहू क्षेत्रातील भात पिकाची रोवणी रखडलेली आहे. तर भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर ते पवनी या मार्गावरील जुनोना गावाला जोडणाऱ्या मार्गावरील रस्ता दुसऱ्याच पावसाने वाहून गेल्याचा प्रकार घडला आहे

**भारत आणि झिम्बाब्वे**

भारत आणि झिम्बाब्वे दरम्यानच्या मालिकेतील पाचवा आणि शेवटचा 20 षटकांचा क्रिकेट सामना आज दुपारी साडेचार वाजता सुरू झाला. झिम्बाब्वे ने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताने 20 षटकांत 6 गडी गमावून 167 धावा केल्या आहेत. दरम्यान भारताने या मालिकेत आधीच 3-1 अशी विजयी आघाडी घेतली आहे.

**राष्ट्र सेविका समिती**

अखिल भारतीय कार्यकारिणी आणि राष्ट्र सेविका समितीच्या प्रतिनिधींची बैठक दिनांक 12 ते 14 जुलै दरम्यान रेशीम बाग, स्मृती मंदिर, नागपूर इथं झाली. या बैठकीत 35 प्रांतातील 400 प्रतिनिधी सहभागी झाले होते. राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांनी 'प्रत्येक व्यक्तीने राष्ट्रहित सर्वोच्च मानून नागरी कर्तव्य पार पाडण आवश्यक असल्याचं' मत या बैठकींत व्यक्त केलं.

या प्रतिनिधी बैठकीत लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जन्मशताब्दीनिमित्त 300 कार्यक्रमांचचं नियोजन करण्यात आलं आहे.

**जुनी पेन्शन योजना आंदोलन**

एक नोव्हेंबर 2005 नंतर शासन सेवेत नियुक्त कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी पुन्हा अमरावती जिल्ह्यातील सरकारी कर्मचारी आक्रमक झाले आहे. अमरावतीच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठ्या संख्येने जुनी पेन्शन धारक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आज हल्लाबोल आंदोलन करत सरकारच्या नकारात्मक धोरणाचा निषेध केला. यावेळी आमदार ज. मो. अभ्यंकर तसच शिक्षक महासंघाचे अध्यक्ष शेखर भोयर यांनी आपल्या संघटनेचा जाहीर पाठिंबा या आंदोलनास दिला आहे.

#######